# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**राज्य सेवा (मुख्य) परीक्षा - २००९**
**अधिसूचना क्रमांक १४७७ (२) /२००९ / तीन**
**दिनांक : १३ नोव्हेंबर, २००९**


**मुख्य कार्यालय** :- बँक ऑफ इंडियाची इमारत, ३ रा माळा, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई-४००००१.
**दूरध्वनी क्रमांक** :- ०२२-२२६७०२१०, २२६७०१४८, २२६७०२४८, २२६७०३३७.
**फॅक्स क्रमांक** :- ०२२ -२२६७३९१५.

**माझगाव कार्यालय** :- विक्रीकर भवन, ९ वा मजला, रुम नंबर ९१५, सरदार बलवंतसिंग दोधी मार्ग (नेसबीट रोड), माझगांव, मुंबई- ४००२०३.
**दूरध्वनी क्रमांक** :- ०२२ -२३७४२१९१.
**फॅक्स क्रमांक** :- ०२२-२३७८१०६१.

**वेबसाईट -** www.mpsc.gov.in
**ईमेल -** sec_mpsc@maharashtra.gov.in
mpscpre@gmail.com

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## राज्य सेवा (मुख्य) परीक्षा २००९

राज्य शासनाच्या सेवेतील खाली नमूद केलेल्या पदांवरील / सेवांमधील नियुक्तीकरिता आयोगामार्फत राज्य सेवा (मुख्य )परीक्षा - २००९ **दिनांक १९ डिसेंबर, २००९** पासून औरंगाबाद, मुंबई, नागपूर व पुणे या ठिकाणी घेण्यात येईल. **सदर परीक्षेसाठीचा अर्ज विहित पोस्ट कार्यालयात स्वीकारण्याचा अंतिम दिनांक २६ नोव्हेंबर,२००९ हा आहे.**

| | | | | | उन्नत व प्रगत गटात न मोडणारे | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | पदाचे नाव व एकूण पदसंख्या | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मांतरित | अ. जमाती | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | वि.मा.प्र. | भ.ज. (क) | भ.ज. (ड ) | इ.मा.व. |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट-अ (एकूण १७ पदे ) | ८ | २ | १ | १ | १ | १ | -- | -- | ३ |
| | महिला - | ३ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | खेळाडू - | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| २ | पोलीस उपअधीक्षक/ सहायक पोलीस आयुक्त, गट-अ, (एकूण २४पदे) | १२ | ३ | २ | १ | १ | -- | १ | -- | ४ |
| | महिला - | ४ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | खेळाडू - | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ३ | उपनिबंधक, सहकारी संस्था, गट-अ (एकूण १२ पदे) | ६ | ३ | -- | १ | -- | १ | -- | -- | १ |
| | महिला - | २ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| | अपंग - | @ **अंशतः कर्णबधीर - १** | | | | | | | | |
| ४ | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-अ (कनिष्ठ) (एकूण ६७ पदे) | ३५ | ९ | ४ | ३ | २ | १ | २ | -- | ११ |
| | महिला - | ११ | २ | १ | १ | १ | -- | १ | -- | ३ |
| | खेळाडू - | २ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| ५ | मुख्याधिकारी/नगरपालिका /नगरपरिषद, गट -अ (एकूण २ पदे) | १ | -- | -- | -- | -- | १ | -- | -- | -- |
| ६ | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-ब (राजपत्रित) (एकूण १२० पदे) | ६० | १५ | ९ | ३ | ३ | २ | ३ | २ | २३ |
| | महिला - | १८ | ४ | ३ | १ | १ | १ | १ | -- | ७ |
| | खेळाडू - | ३ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | अपंग - | @ **अंशतः कर्णबधीर - १** | | | | | | | | |
| ७ | कक्ष अधिकारी, गट-ब (एकूण ६ पदे) | ३ | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | १ |
| | महिला - | १ | १ | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| ८ | गट विकास अधिकारी, गट-ब, (एकूण ४६ पदे) | २३ | ५ | ३ | १ | २ | -- | २ | १ | ९ |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | महिला - | **७** | **२** | **१** | **--** | **१** | **--** | **१** | **--** | **३** |
| | खेळाडू - | **१** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **१** |
| | अपंग - | @**अंशतः कर्णबधीर - १** | | | | | | | | |
| ९ | उपअधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट-ब (एकूण १५पदे ) | **८** | **२** | **२** | **१** | **--** | **--** | **--** | **--** | **२** |
| | महिला - | **३** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **१** |
| १० | सहायक आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, गट-ब (एकूण ५ पदे ) | **३** | **१** | **१** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** |
| | महिला - | **१** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** |
| ११ | सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट-ब (एकूण १ पद) | **--** | **--** | **१** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** |
| १२ | सहायक निबंधक,सहकारी संस्था, गट-ब (एकूण ३८ पदे) | **२२** | **६** | **३** | **१** | **--** | **--** | **--** | **--** | **६** |
| | महिला - | **६** | **२** | **१** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **२** |
| | खेळाडू - | **१** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** |
| | अपंग - | @ **अल्पदृष्टी - १** | | | | | | | | |
| १३ | तालुका निरीक्षक , भूमी अभिलेख, गट-ब (एकूण ६पदे) | **३** | **२** | **१** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** |
| | महिला - | **१** | **१** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** | **--** |

**टीप :-** (१) @ अपंगासाठी असलेली पदे ही त्या संवर्गाच्या भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी आहेत.
(२) महिला व खेळाडूंसाठी आरक्षित असलेली पदे त्या त्या संवर्गाच्या एकूण पदसंख्येपैकी आहेत.
(३) वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२. मुख्य परीक्षेस प्रवेश :-**

**२.१** राज्य सेवा (पूर्व) परीक्षा -२००९ च्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या आणि अधिसूचनेत/माहितीपुस्तिकेत नमूद केलेल्या शैक्षणिक अर्हता व अन्य अटीची पूर्तता करणा-या उमेदवारास मुख्य परीक्षेस प्रवेश दिला जाईल.

**२.२** माहितीपुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक २.१.६.१ मध्ये नमूद केल्यानुसार राज्य सेवा (मुख्य) परीक्षा दोन टप्प्यात घेण्यात येईल.
(१) लेखी परीक्षा :- लेखी परीक्षेसाठी एकूण १६०० गुण राहतील.
(२) मुलाखत :- मुलाखतीसाठी एकूण २०० गुण राहतील.

**२.३** प्रस्तुत मुख्य परीक्षेकरिता उमेदवारांनी माहितीपुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक २.१.६.६ मध्ये नमूद केलेल्या वैकल्पिक विषयांपैकी दोन वैकल्पिक विषयांची निवड करावयाची आहे. उमेदवारांनी निवडलेल्या विषयांचे संकेतांक मुख्य परीक्षेच्या अर्जात इंग्रजी अंकामध्ये विहित ठिकाणी बिनचूकपणे लिहावेत.

**२.४** वैकल्पिक विषय निवडताना निर्बंधित गटातील विषयांबाबतच्या माहितीपुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक २.१.६.७ मधील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. निर्बंधित गटातील विषय निवडल्यास त्यामध्ये बदल करण्याची विनंती विचारात घेतली जाणार नाही व परिणामी मुख्य परीक्षेकरिता प्रवेश नाकारला जाईल.

**२.५** अर्ज आयोगाकडे सादर केल्यानंतर वैकल्पिक विषयात कोणताही बदल कोणत्याही परिस्थितीत करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

**२.६** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांनी विहित पोस्ट कार्यालयातून मुख्य परीक्षेसाठी अर्ज विकत घेऊन व अर्ज परिपूर्ण भरून आवश्यक कागदपत्र, परीक्षा-शुल्क, छायाचित्र इत्यादीसह **दिनांक २६ नोव्हेंबर,२००९** पर्यंत पोस्टाच्या कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

**२.७** राज्य सेवा पूर्व परीक्षेच्या अर्जामध्ये नमूद केलेली जातीविषयक वर्गवारी, क्रिमीलेअर, महिला, अपंग, खेळाडू इत्यादींविषयक दाव्यांमध्ये फेरबदल करता येणार नाही.

२.८ पूर्व परीक्षेचा अर्ज करताना जातीचे, क्रिमीलेअर अथवा अपंगत्वाचे प्रमाणपत्र उपलब्ध नसल्याने केवळ अराखीव पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवाराने मुख्य परीक्षेच्या वेळी आरक्षित पदासाठी दावा केल्यास तो कोणत्याही परिस्थितीत स्वीकारला जाणार नाही. तसेच वर्गवारीचा दावा बदलत आहे, ही उमेदवाराची सबब मान्य केली जाणार नाही.

२.९ मागासवर्गीय, अपंग, महिला अथवा खेळाडूंसाठी आरक्षित असलेल्या पदाकरिता दावा करणा-या उमेदवारांनी अर्जातील विहित ठिकाणी आरक्षित पदासाठी निरपवादपणे दावा करणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांचा आरक्षित पदासाठी विचार केला जाणार नाही.

२.१० पूर्व परीक्षेच्या अर्जातील व मुख्य परीक्षेच्या अर्जातील कोणत्याही माहितीमध्ये तफावत आढळून आल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

**३. वयोमर्यादा -**

**३.१** अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, गट-अ, उपअधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, गट-ब व सहायक आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, गट-ब या पदांसाठी उमेदवाराचे वय दिनांक १ एप्रिल, २००९ रोजी किमान १९ वर्षे व कमाल ३० वर्ष असावे. म्हणजेच उमेदवार दिनांक २ एप्रिल, १९७९ च्या पूर्वी आणि १ एप्रिल, १९९० च्या नंतर जन्मलेला नसावा. इतर सर्व पदांसाठी उमेदवाराचे वय दिनांक १ एप्रिल, २००९ रोजी किमान १९ वर्षे व कमाल ३३ वर्ष असावे. म्हणजेच उमेदवार दिनांक २ एप्रिल, १९७६ च्या पूर्वी आणि १ एप्रिल, १९९० च्या नंतर जन्मलेला नसावा.

**३.२** विहित वयोमर्यादा शिथिल करणे -

**३.२.१** दिनांक १ जानेवारी १९६४ ते २५ मार्च १९७१ या कालावधीत भूतपूर्व पूर्व पाकिस्तानातून भारतात स्थलांतर केलेल्या व्यक्ती यांचे बाबतीत वयोमर्यादा ३ वर्षांनी शिथिलक्षम आहे.

**३.२.२** दिनांक १ नोव्हेंबर, १९६४ नंतर भारतात स्थलांतर केलेल्या व मुळच्या भारतीय असलेल्या श्रीलंकेतील स्वदेशी प्रत्यावर्ती व्यक्ती आणि दिनांक १ जून, १९६३ नंतर ब्रम्हदेशातून भारतात स्थलांतर केलेल्या व्यक्ती यांच्याबाबतीत पदासाठी विहित केलेली वयोमर्यादा ३ वर्षांनी शिथिल करण्यात येईल. स्थलांतरित व्यक्ती अनुसूचित जातीपैकी आणि अनुसूचित जमातीपैकी असल्यास त्यांना वयात ५० वर्षापर्यंतची सूट देण्यात येईल.

**३.२.३** महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या व महाराष्ट्राचे सर्वसाधारण रहिवाशी असलेल्या अनुसूचित जाती (बौद्ध धर्मांतरितांसह), अनुसूचित जमाती तसेच समाजाच्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र असलेल्या विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड) व इतर मागास वर्ग संवर्गातील उमेदवारांना विहित कमाल वयोमर्यादा ५ वर्षाने शिथिलक्षम असेल.

**३.२.४** पात्र अपंग उमेदवारांना उच्च वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

**३.२.५** ज्या माजी सैनिक/आणीबाणी व अल्प सेवा राजादिष्ट अधिका-यांची किमान पाच वर्षे सैन्यात सलग सेवा झालेली आहे व ज्यांना नेमून दिलेले काम पूर्ण झाल्यावर कार्यमुक्त केलेले आहे (यामध्ये ज्यांचे नेमून दिलेले काम पुढील सहा महिन्यात पूर्ण होणार आहे व त्यानंतर त्यांना कार्यमुक्त करण्यात येणार आहे त्यांचाही समावेश आहे) किंवा ज्यांच्या बाबतीत पाच वर्षाचा सैनिकी सेवेचा नेमून दिलेला कालावधी पूर्ण झाला आहे व ज्यांची नेमणूक पाच वर्षापुढे वाढवून देण्यात आलेली असून त्यांना शासकीय सेवेत नेमणूक मिळाल्यास तीन महिन्यात कार्यमुक्त करण्यात येईल असे प्रमाणित करण्यात येणार असेल अशा व्यक्तींसाठी पाच वर्षे कमाल वयोमर्यादेत सवलत देण्यात येईल. ही सवलत दिनांक १ मे, २००८ पूर्वी सेवामुक्त झालेल्या माजी सैनिक/आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिका-यांनाच लागू राहील.

**३.२.६** ज्या माजी सैनिक /आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी यांची सेवा बडतर्फीने, गैरवर्तणूक किंवा अकार्यक्षमता या कारणांसाठी अथवा सैनिकी सेवेसाठी शारीरिक क्षमता नसल्याने किंवा आजारपणामुळे संपुष्टात आणली आहे, अशा व्यक्ती वयोमर्यादेच्या सवलतीसाठी पात्र ठरणार नाहीत.

**३.२.७.** एकदा वयोमर्यादेतील सवलतीचा फायदा घेऊन नागरी सेवेत प्रवेश केलेल्या माजी सैनिक / आणीबाणी व अल्पसेवा राजादिष्ट अधिकारी राज्य शासनाच्या सेवेमध्ये गट-क व गट-ड मध्ये तो धारण करीत असलेल्या पदापेक्षा उच्च श्रेणी वा अन्य संवर्ग यातील नियुक्तीसाठी माजी सैनिक म्हणून अनुज्ञेय ठरविण्यात आलेल्या वयोमर्यादेची सूट सदर नवीन नियुक्तीसाठी देखील अनुज्ञेय राहील.

**४. अर्हता व अर्हता धारण केल्याचा दिनांक -**

**४.१ अर्हता :-**

**४.१.१** मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी किंवा महाराष्ट्र शासनाने विहित केलेली समतुल्य शैक्षणिक अर्हता.

**४.१.२** सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट- ब पदाकरिता भौतिकशास्त्र व गणित या विषयासह विज्ञान अथवा अभियांत्रिकी या शाखेतील पदवी धारण केलेली असणे आवश्यक.

**४.१.३** मराठीचे ज्ञान आवश्यक.

**४.१.४** अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट- अ, उपअधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, गट-ब, पोलीस उप अधीक्षक /सहायक पोलीस आयुक्त, गट- अ, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट - ब या पदावरील नियुक्तीसाठी वर नमूद केलेल्या अर्हतेसोबत उमेदवाराची शारीरिक अर्हता खाली दर्शविल्याप्रमाणे असणे आवश्यक आहे.

**(एक) पोलीस उप अधीक्षक /सहायक पोलीस आयुक्त, गट- अ :-**

| पुरुष उमेदवारांकरिता | महिला उमेदवारांकरिता |
|---|---|
| उंची - १६५ सें. मी. (अनवाणी) (कमीतकमी)<br>छाती - न फुगविता ८४ से.मी. फुगविण्याची क्षमता किमान ५ से.मी. आवश्यक | उंची - १५७ सें.मी. (अनवाणी) (कमीतकमी) |

**(दोन) अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट- अ उपअधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, गट-ब :-**

| पुरुष उमेदवारांकरिता | महिला उमेदवारांकरिता |
|---|---|
| उंची - १६५ सें. मी. (अनवाणी) (कमीतकमी)<br>छाती - न फुगविता ७९ से.मी. फुगविण्याची क्षमता किमान ५ से.मी. आवश्यक | उंची- १५५ सें.मी. (अनवाणी) (कमीतकमी) |

**(तीन) सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट - ब :-**

| पुरुष उमेदवारांकरिता | महिला उमेदवारांकरिता |
|---|---|
| उंची - १६३ सें. मी. (अनवाणी) (कमीतकमी)<br>छाती - न फुगविता ८४ से.मी. फुगविण्याची क्षमता किमान ५ से.मी. आवश्यक<br>चष्म्यासह अथवा चष्म्याशिवाय चांगली दृष्टी आणि रंगांधळेपणा नसावा. | उंची- १६३ सें.मी. (अनवाणी) (कमीतकमी)<br>चष्म्यासह अथवा चष्म्याशिवाय चांगली दृष्टी आणि रंगांधळेपणा नसावा. |

**४.१.७ अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, गट- अ, उपअधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, गट-ब, पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त, गट- अ** व **सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, गट ब** या पदासाठी पसंतीक्रम दर्शविलेल्या उमेदवारांच्या बाबतीत विहित शारीरिक मोजमापे अर्जामध्ये आढळून न आल्यास त्यांच्या पसंतीक्रमाचा संबंधित पदासाठी विचार केला जाणार नाही.

**४.१.८** प्रस्तुत परीक्षेच्या अंतिम निकालाच्या आधारे शिफारस झालेल्या उमेदवारांची नियुक्ती करण्यापूर्वी त्यांची शारीरिक मोजमापे शासनाच्या संबंधित विभागामार्फत सक्षम प्राधिका-याकडून तपासून घेण्यात येतील. वरीलप्रमाणे शारीरिक मोजमापे न भरल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी अपात्र ठरेल व त्याची अन्य पदासाठी शिफारस केली जाणार नाही.

**४.२ अर्हता धारण केल्याचा दिनांक :-**

**४.२.१** मुख्य परीक्षेचा अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम **दिनांकास म्हणजे दिनांक २६ नोव्हेंबर,२००९** अथवा त्यापूर्वी अर्हता धारण केलेली असणे आवश्यक.

**४.२.२** ज्या पदवीसाठी आंतर्वासिता (Internship) किंवा कार्यशाळेतील प्रत्यक्ष कामाचा अनुभव निर्धारित केला असेल ती पदवी धारण करणा-या उमेदवारांनी आंतर्वासिता किंवा आवश्यक अनुभव संबंधित परीक्षेचा अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास किंवा त्यापूर्वी धारण करणे आवश्यक.

**५. अपंग उमेदवारांसाठी पात्रता :- प्रस्तुत परीक्षेमधून भरण्यात येणा-या पदांच्या बाबतीत** खालील पदांसमोर दर्शविलेल्या शारीरिक पात्रतेचे निकष धारण करणारे उमेदवारच त्या त्या पदावर गुणवत्तेनुसार शिफारशीस पात्र असतील.

| अ. क्र. | पदाचे नांव | शासन निर्णय | अपंगत्वाचा प्रकार |
|---|---|---|---|
| १ | (अ)उपनिबंधक सहकारी संस्था, गट-अ<br>(ब) सहायक निबंधक सहकारी संस्था,गट-ब | क्र.राजस-१४०४/ प्र.क्र.१६०/५-स, दिनांक ११ मे, २००५ | अंशतः दृष्टिदोष [Partially sighted]<br>अंशतः कर्णबधीर [Partially Deaf]<br>अस्थिव्यंग [One leg] |
| २ | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-अ (कनिष्ठ) | क्र.संकीर्ण-११.०२/प्र.क्र.३४/२००२/कोषा-प्र.३, दिनांक २८ जानेवारी, २००५. | अंशतः कर्णबधीर [Partially Deaf]<br>अस्थिव्यंग [One leg & One Arm] |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | मुख्याधिकारी, नगरपालिका / नगरपरिषद, गट - अ | क्र.एससीओ-१२९८/ ३५६३ /प्र.क्र.११३/ ९८/नवि-१४अ, दिनांक २९ एप्रिल, १९९९ | अंशतः दृष्टिदोष [Partially sighted] अंशतः कर्णबधीर [Partially Deaf] अस्थिव्यंग |
| ४ | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, गट-ब | क्र.संकीर्ण-११.०२/प्र.क्र.३४/२००२/कोषा-प्र.३, दिनांक १९ मे, २००४. | अंशतः कर्णबधीर [Partially Deaf] अस्थिव्यंग [One leg ] |
| ५ | कक्ष अधिकारी, गट-ब, | क्र. सीसीए - १७०६/ प्र.क्र.-२९/ ०६/ १४-ब, दिनांक २१ जुलै, २००८. | अधुदृष्टी [low vision] अंशतः कर्णबधीर [Partially Deaf] अस्थिव्यंग [One leg/Both Leg] |
| ६ | गट विकास अधिकारी, गट - ब | क्र.मविसे-१०९८/ प्र.क्र.२७४७/ आस्था-३, दिनांक १७ जूलै, २००८. | अंशतः दृष्टिदोष /अधुदृष्टी [Partially sighted/low vision] अंशतः कर्णबधीर [Partially Deaf] अस्थिव्यंग [One leg & One Arm] |
| ७ | सहायक आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, गट-ब | क्र. इएसटी ४०९८/ सीआर.-१५४/ ई एक्ससी-४, दिनांक १६ फोब्रुवारी, २००९. | अधुदृष्टी [low vision] अंशतः कर्णबधीर [Partially Deaf] अस्थिव्यंग [One Arm/ One leg] |
| ८ | तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, गट-ब | क्र. स - ११/२००४/ प्र.क्र.-४७/ ई -६, दिनांक १३ ऑगस्ट, २००४. | अंशतः कर्णबधीर [Partially Deaf] |

**६. अपंग उमेदवारांना लेखनिक पुरविण्याबाबत :-**

**६.१** आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य यांचे परिपत्रक क्रमांक अकआ/प्र-७/लेखनिक/ सुविधा / २००६ -०७/ २९५१, दिनांक २० डिसेंबर, २००६ मधील मार्गदर्शक तत्वानुसार अपंग उमेदवारांना परीक्षेच्या वेळी लेखनिक पुरविण्याची व्यवस्था करण्यात येईल.

**६.२** परीक्षेच्या वेळी लेखनिक उपलब्ध करून देण्याबाबत अर्जामध्ये सुस्पष्ट मागणी करणे आवश्यक आहे.

**६.३** अर्जामध्ये मागणी केली नसल्यास व आयोगाची पूर्व परवानगी घेतली नसल्यास ऐनवेळी लेखनिकाची मदत घेता येणार नाही.

**६.४** लेखनिकाची व्यवस्था उमेदवाराकडून स्वतः केली जाणार आहे, की आयोगामार्फत लेखनिकाची व्यवस्था करावी लागणार आहे, याचा अर्जात सुस्पष्ट उल्लेख करावा.

**६.५** उमेदवाराने स्वतः लेखनिकाची व्यवस्था केली असल्यास लेखनिक आणि उमेदवार शक्यतो एकाच शाखेचे असावेत.

**६.६** उमेदवाराने स्वतः लेखनिकाची व्यवस्था केली असल्यास, तसेच लेखनिक आणि उमेदवार एकाच शाखेचे असल्यास लेखनिक उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रतेपेक्षा एक पायरी/टप्पा कमी असावा. मात्र लेखनिक व उमेदवार भिन्न शाखेचे असल्यास सदर अट लागू नाही.

**६.७** ज्या उमेदवारांनी परीक्षेच्यावेळी लेखनिकाची मदत पुरविण्याची आयोगास अर्जामध्ये विनंती केली आहे व ज्या उमेदवारांना प्रत्यक्ष परीक्षेच्या दिवशी लेखनिकाची मदत पुरविण्यात आली आहे, अशा उमेदवारांना पेपर सोडविण्यासाठी प्रत्येक तासाला २० मिनिटे अतिरिक्त वेळ दिला जाईल.

**६.८** लेखनिकाची व्यवस्था त्या उमेदवाराने स्वतः केली असल्यास, ऐनवेळी सदर लेखनिक अनुपस्थित राहिल्यास त्याची जबाबदारी पूर्णतः उमेदवारावर राहील.

**६.९** काही अपवादात्मक परिस्थितीत परीक्षा सुरु होण्याच्या ऐनवेळी लेखनिक बदलास मान्यता देण्याचे अधिकार केंद्रप्रमुखांना राहतील. वेगवेगळया विषयाच्या पेपरसाठी एकापेक्षा अधिक लेखनिकांची मदत घेता येणार नाही. मात्र काही अपवादात्मक परिस्थितीमध्ये सदर बदल करण्याचा अधिकार केंद्रप्रमुखांना राहील.

**६.१०** उमेदवारांने स्वतः लेखनिकाची व्यवस्था केल्यास त्याच्या मानधनाची व्यवस्था स्वतः उमेदवारास करावी लागेल.

**६.११** लेखनिक आयोगामार्फत / जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत पुरविण्यात आला असल्यास आयोगाने विहित केल्याप्रमाणे उमेदवाराने लेखनिकाचे मानधन संबंधित केंद्रप्रमुखांकडे परीक्षा सुरु होण्यापूर्वी जमा करणे आवश्यक राहील. लेखनिकाने परीक्षा सुरु होण्याच्या वेळेपूर्वी एक तास अगोदर परीक्षा केंद्रावर उपस्थित राहून नियुक्ती पत्र केंद्रप्रमुखांच्या स्वाधीन करावे.

**६.१२** प्रवेश प्रमाणपत्रावरील उमेदवारांना दिलेल्या सर्व सूचनांचे लेखनिकाने पालन करणे आवश्यक राहील.

**६.१३** लेखनिकाने स्वतः प्रश्नपत्रिका सोडवू नये अथवा उमदेवारास कोणत्याही प्रकारे मार्गदर्शन वा सूचना करू नयेत. उमेदवाराकडून तोंडी सूचविण्यात येणारे उत्तर लेखनिकाने नमूद करणे आवश्यक राहील.

**६.१४** लेखनिकाने परीक्षा कालावधीत प्रश्नोत्तराबाबत अथवा इतर कोणत्याही विषयी उमेदवाराशी चर्चा / गप्पा करू नयेत. तसेच, इतर लेखनिक / उमेदवार यांच्याशी बोलू नये.

**६.१५** लेखनिकाने व उमेदवाराने आयोगाच्या सूचनांचे पालन न केल्यास त्यांच्याविरुध्द प्रचलित कायदे / नियमानुसार कडक कारवाई करण्यात येईल.

**६.१६** परीक्षेच्या वेळी लेखनिकाची व्यवस्था उमेदवार स्वतः करणार असल्यास, खालील माहितीसह अर्ज सादर केल्यापासून ७ दिवसांच्या अवधीत सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्या नावे अर्जाच्या छायांकित प्रतीसह साध्या कागदावर स्वतंत्र अर्ज करावा व तसा अर्ज केल्याचे माझगाव येथील कार्यालयात दूरध्वनीवरुन कळवावे. :-

**६.१६.१** परीक्षेचे नाव

**६.१६.२** अर्ज क्रमांक

**६.१६.३** उमेदवाराचे नाव

**६.१६.४** लेखनिकाचे नाव

**६.१६.५** लेखनिकाचा संपूर्ण पत्ता

**६.१६.६** उमेदवाराची शैक्षणिक अर्हता

**६.१६.७** लेखनिकाची शैक्षणिक अर्हता

**६.१६.८** उमेदवार व लेखनिक एकाच विद्या शाखेचे आहेत काय

**६.१६.९** उमेदवार व लेखनिक एकाच विद्या शाखेचे असल्यास लेखनिक उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रतेपेक्षा एक पायरी / टप्पा कमी आहे काय.

**७. अर्ज व माहितीपुस्तिका :-**

**७.१** आयोगाने विहित केलेल्या नमुन्यातच मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी अर्ज करणे आवश्यक आहे.

**७.२** अर्जासह माहितीपुस्तिका खालील ठिकाणी पोस्टाच्या कार्यालयीन वेळेत विक्रीसाठी उपलब्ध आहे.

| अ.क्र. | जिल्हा | पोस्ट कार्यालये |
|---|---|---|
| १ | **अहमदनगर** | अहमदनगर - प्रधान डाकघर, श्रीरामपुर - प्रधान डाकघर, अकोले, संगमनेर, राहुरी, नेवासा, शेवगाव, पारनेर, कोपरगाव, पाथर्डी, श्रीगोंदे, कर्जत, जामखेड, राहता. |
| २ | **अकोला** | अकोला - प्रधान डाकघर , अकोट, बाळापूर, मुर्तिजापूर, तेल्हारा, पातूर, बार्शी-टाकळी. |
| ३ | **अमरावती** | अमरावती -प्रधान डाकघर, परतवाडा - प्रधान डाकघर, नांदगाव -खांडेश्वर, चांदुर रेल्वे, तिवसा, मोर्शी, वरुड, अचलपूर, चांदुर बाजार, दर्यापूर, अंजनगाव, धारणी, चिखलदरा, भातकुली, धामणगाव रेल्वे . |
| ४ | **औरंगाबाद** | औरंगाबाद - प्रधान डाकघर, कन्नड, सिल्लोड, सोयगाव, खुलदाबाद, वैजापूर, गंगापूर, पैठण, फुलंब्री. |
| ५ | **बीड** | बीड - प्रधान डाकघर, गेवराई, आष्टी, माजलगाव, पाटोदा, केज, अंबेजोगाई, धारुर, परळी, वडवणी, शिरुर (कासार). |
| ६ | **भंडारा** | भंडारा - प्रधान डाकघर, साकोली, पवनी, तुमसर, मोहाडी, लाखांदूर, लाखानी. |
| ७ | **बुलढाणा** | बुलढाणा - प्रधान डाकघर, खामगाव - प्रधान डाकघर, जळगावजामोद, मलकापूर, नांदुरा, चिखली, सिंदखेड राजा, देऊळगाव राजा, मोताळा, शेगाव, संग्रामपूर, लोणार, मेहकर. |
| ८ | **चंद्रपूर** | चंद्रपूर - प्रधान डाकघर, गोंडपिपरी, ब्रम्हपुरी, सावली, राजुरा, वरोरा, भद्रावती, चिमूर, नागभीड, मूल, सिंदेवाही, बल्लारपूर, कोरपना, पोंभुर्णा, जिवती. |
| ९ | **धुळे** | धुळे - प्रधान डाकघर, शिरपूर, शिंदखेडा, साक्री. |
| १० | **गडचिरोली** | गडचिरोली, कुरखेडा, अहेरी, धानोरा, सिरोंचा, अरमोरी, चामोर्शी, एटापल्ली, भामरागड, कोरची, देसाईगंज, मुलचेरा |
| ११ | **गोंदिया** | गोंदिया - प्रधान डाकघर, अर्जुनी मोर, आमगाव, देवरी, गोरेगाव, सडक अर्जुनी, सालेकसा, तिरोडा. |
| १२ | **हिंगोली** | हिंगोली, सेनगाव, कळमनुरी, औंढा नागनाथ, बसमत. |
| १३ | **जालना** | जालना - प्रधान कार्यालय, अंबड, भोकरदन, जाफ्राबाद, परतूर, मंठा, बदनापूर, धनसावंगी. |
| १४ | **जळगाव** | जळगाव - प्रधान डाकघर, भुसावळ - प्रधान डाकघर, चाळीसगाव- प्रधान डाकघर, चोपडा, यावल, अंमळनेर, एरंडोल, पाचोरा, रावेर, मुक्ताईनगर, पारोळा, भडगाव, जामनेर, धरणगाव, बोदवड. |
| १५ | **कोल्हापूर** | कोल्हापूर शहर - प्रधान डाकघर, कोल्हापूर - प्रधान डाकघर, इचलकरंजी - प्रधान डाकघर, शाहूवाडी, हातकणंगले, पन्हाळा, शिरोळ, करवीर, गगनबावडा, कागल, आजरा, चंदगड, भुदरगड, गडहिंग्लज, राधानगरी. |
| १६ | **लातूर** | लातूर - प्रधान डाकघर, अहमदपूर, औसा, निलंगा, उदगीर, रेणापूर, चाकूर, देवनी, शिरुर (अनंतपाळ), जळकोट. |
| १७ | **नंदुरबार** | नंदुरबार, अक्कलकुवा, अक्राणी, तळोदा, शहादा, नवापूर. |
| १८ | **नागपूर** | नागपूर - जी.पी.ओ., नागपूर शहर - प्रधान डाकघर, कामठी - प्रधान डाकघर, काटोल, सावनेर, रामटेक, उमरेड, हिंगणा, नरखेड, कळमेश्वर, मौदा, भिवापूर, पारसिवनी, कुही. |
| १९ | **नांदेड** | नांदेड - प्रधान डाकघर, किनवट, हदगाव, भोकर, कंधार, बिलोली, मुखेड, देगलूर, लोहा, मुदखेड, हिमायतनगर, माहूर, धर्माबाद, उमरी, नायगाव (खैरगाव), अर्धापूर. |

| | | |
|---|---|---|
| **२०** | **नाशिक** | नाशिक - प्रधान डाकघर , नाशिकरोड- प्रधान डाकघर, मालेगाव - प्रधान डाकघर, निफाड, सिन्नर, सुरगणा, दिंडोरी, कळवण, पेठ, चांदवड, नांदगाव, येवले, इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, देवळा, बागलाण. |
| **२१** | **उस्मानाबाद** | उस्मानाबाद - प्रधान डाकघर, परांडा, भूम, तुळजापूर, कळंब, उमरगा, लोहारा, वाशी. |
| **२२** | **परभणी** | परभणी - प्रधान डाकघर, जिंतूर, पाथरी, गंगाखेड, पूर्णा, पालम, सेलू, सोनपेठ, मानवत. |
| **२३** | **पुणे** | पुणे - प्रधान डाकघर, पुणे शहर - प्रधान डाकघर, शिवाजी नगर - प्रधान डाकघर, जुन्नर, आंबेगाव, खेड, शिरूर, मावळ, दौंड, भोर, हवेली, मुळशी, वेल्हे, पुरंदर, बारामती, इंदापूर, घोडेगाव. |
| **२४** | **रायगड** | अलिबाग - प्रधान डाकघर, पनवेल - प्रधान डाकघर, कर्जत, उरण, खालापूर, पेण, रोहा, सुधागड, मुरुड, माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन, महाड, पोलादपूर, तळा. |
| **२५** | **रत्नागिरी** | रत्नागिरी - प्रधान डाकघर, चिपळूण- प्रधान डाकघर, मंडणगड, दापोली, खेड, गुहागर, संगमेश्वर, राजापूर, लांजा. |
| **२६** | **सांगली** | सांगली - प्रधान डाकघर, मिरज - प्रधान डाकघर, खानापूर, शिराळा, वाळवा, तासगाव, जत, आटपाडी, कवठे-महंकाळ, पलुस, कडेगाव, विटा, इस्लामपूर. |
| **२७** | **सातारा** | सातारा - प्रधान डाकघर, कराड- प्रधान डाकघर, खंडाळा, फलटण, वाई, महाबळेश्वर, जावळी, माण, कोरेगाव, खटाव, पाटण. |
| **२८** | **सिंधुदूर्ग** | मालवण - प्रधान डाकघर, सावतंवाडी -प्रधान डाकघर, देवगड, कुडाळ, कणकवली, वेंगुर्ले, वैभववाडी, दोडामार्ग. . |
| **२९** | **सोलापूर** | सोलापूर- प्रधान डाकघर, पंढरपूर - प्रधान डाकघर, करमाळा, बार्शी, माढा, माळशिरस, मोहोळ, सांगोले, मंगळवेढा, अक्कलकोट. |
| **३०** | **ठाणे** | ठाणे - प्रधान डाकघर, कल्याण - प्रधान डाकघर, पालघर - प्रधान डाकघर, डहाणू, मोखाडा, जव्हार, वाडा, वसई, भिवंडी, शहापूर, मुरबाड, तलासरी, अंबरनाथ, उल्हासनगर, विक्रमगड. |
| **३१** | **वर्धा** | वर्धा - प्रधान डाकघर, आर्वी, हिंगणघाट, देवळी, समुद्रपूर, कारंजा, आष्टी, सेलू,. |
| **३२** | **वाशिम** | वाशिम, रिसोड, मानोरा, मालेगाव, मंगरूळपीर, कारंजा. |
| **३३** | **यवतमाळ** | यवतमाळ - प्रधान डाकघर, झरी - जामडी, पुसद, वणी, बाभुळगाव, कळंब, घाटंजी, राळेगाव, मोरेगाव, दिग्रस, नेर, उमरखेड, महागाव, आर्णी, केळापूर, दारव्हा. |
| **३४** | **मुंबई** | १) काळबादेवी प्रधान डाकघर, रेशम बाजार लेन, मुंबई- २.<br>२) दादर प्रधान डाकघर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, मुंबई- १४.<br>३) चिंचबंदर प्रधान डाकघर, शायदा मार्ग, मस्जीद रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई- ९.<br>४) अंधेरी प्रधान डाकघर, डी.एन.नगर, अंधेरी, मुंबई- ५३.<br>५) चेंबूर प्रधान डाकघर, टेन्थ रोड, मुंबई- ७१.<br>६) बोरिवली प्रधान डाकघर, एम.एच.बी. कॉलनी, मुंबई- ९१.<br>७) माहिम प्रधान डाकघर, टी. एच. कटारिया मार्ग, मुंबई- १६.<br>८) मुंबई सेंट्रल प्रधान डाकघर, डॉ. बेलासिस रोड, मुंबई- ८.<br>९) माझगाव डिलिव्हरी पोस्ट ऑफिस, तळमजला, पोरबंदरवाला अपार्टमेंट, माझगांव, मुंबई- १०.<br>१०) स्टॉक एक्स्चेंज पोस्ट ऑफिस, फोर्ट मेन्शन, हमाम स्ट्रीट, फोर्ट, मुंबई- १.<br>११) मुंबई जी. पी. ओ. मुंबई - १. |
| **३५** | **नवी मुंबई** | १) वाशी पोस्ट ऑफीस, प्लॉट नंबर १८ व १९, सेक्टर-१६ अ, वाशी-४००७०३.<br>२) कोकण भवन पोस्ट ऑफीस, विभागीय आयुक्त कार्यालय, सिडको भवन समोर, सीबीडी बेलापूर- ४००६१४. |

**७.३** अर्जासह माहितीपुस्तिका उपलब्ध असलेल्या पोस्ट कार्यालयांची यादी आयोगाच्या वेबसाईटवर (www.mpsc.gov.in) उपलब्ध आहे.

**७.४** अर्जासह माहितीपुस्तिकेची किंमत रुपये १००/- इतकी आहे.

**७.५** प्रस्तुत परीक्षेस अर्ज करण्यासाठी "**स्पर्धा परीक्षेकरिता अर्ज व माहितीपुस्तिका**" असे नमूद केलेली **फिक्कट निळया रंगाची** माहितीपुस्तिकाच विकत घ्यावी असे उमेदवारांना सूचित करण्यात येत आहे.

**७.६** अर्ज एकदाच व फक्त एकाच परीक्षेसाठी वापरता येईल.

**७.७** अर्जासह माहितीपुस्तिकेच्या विक्रीची व्यवस्था फक्त निवडक पोस्ट कार्यालयातच करण्यात आली आहे. आयोगाच्या कार्यालयात अर्जाच्या विक्रीची कोणतीही व्यवस्था करण्यात आलेली नाही. तसेच अर्ज मागविण्याकरिता पत्राद्वारे विनंती केल्यास त्याचा विचार केला जाणार नाही.

**७.८** अर्जासह माहितीपुस्तिकेच्या उपलब्धतेबाबत कोणतीही अडचण उद्‌भवल्यास उमेदवारांनी संबंधित पोस्ट मास्तर अथवा आयोगाच्या २२६७६४१० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

**८. अर्ज सादर करण्याचे ठिकाण व अर्ज स्वीकारण्याचा अंतिम दिनांक :-**

**८.१** संपूर्ण भरलेला अर्ज माहितीपुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक ६.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रमाणपत्राच्या प्रती व परीक्षा शुल्कासह वर नमूद केलेल्या पोस्ट कार्यालयांपैकी कोणत्याही ठिकाणी पोस्टाच्या कार्यालयीन वेळेत **दिनांक २६ नोव्हेंबर,२००९** पर्यंत स्वीकारण्यात येईल.

**८.२** संपूर्ण भरलेला अर्ज व परीक्षा शुल्क फक्त पोस्ट कार्यालयामार्फत विहित कालावधीत स्वीकारण्यात येईल. आयोगाच्या कार्यालयात कोणत्याही परिस्थितीत अर्ज स्वीकारला जाणार नाही. अथवा यासंदर्भातील चौकशीची दखल घेतली जाणार नाही.

**९. शुल्क :-**

**९.१** अमागास - रुपये ४००/-

**९.२** मागासवर्गीय - रूपये २००/-

**९.३** परीक्षा शुल्क अर्जासोबत रोखीने भरणे आवश्यक आहे.

**१०. अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे -**

**१०.१ माहितीपुस्तिकेच्या भाग - सहा मध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित (Xerox) प्रती अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.**

**१०.२** मुलाखतीच्या दिवशी सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

**११.** पदांबाबतची इतर माहिती, परीक्षा योजना, आरक्षण, निवडीचे सर्वसाधारण स्वरुप, परीक्षा केंद प्रमाणपत्राचे नमूने इत्यादि माहिती माहितीपुस्तिकेत उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

**१२. गुणांची पडताळणी करण्याबाबतची पध्दत -**

**१२.१** पारंपरिक स्वरुपाच्या परीक्षेच्या उत्तरपुस्तिकांच्या गुणांची पडताळणी करण्यात येते, फेरमुल्यांकन केले जात नाही.

**१२.२** गुणपत्रिका निर्गमित केल्याच्या दिनांकापासून साधारणत: एका महिन्याच्या आत उमेदवाराने गुणांची पडताळणी करण्याकरिता गुणपत्रिकेच्या झेरॉक्स प्रतींसह साध्या कागदावर अर्ज केल्यास त्याचा विचार केला जाईल. मात्र अर्जासोबत प्रत्येक विषयाला **रु. १००/-** प्रमाणे **SECRETARY, MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION** यांच्या नावे रेखांकित केलेला आवश्यक त्या रकमेचा व मुंबई येथे देय असलेला डिमांड ड्राफ्ट जोडणे आवश्यक राहील.

**१२.३** पडताळणीसाठी अर्ज सादर करतांना अर्जामध्ये परीक्षेचे नांव, बैठक क्रमांक, पडताळणीचे विषय तसेच डिमांड ड्राफ्टचा क्रमांक व दिनांक, बँकेचे नांव व रक्कम इत्यादिबाबतचा तपशील नमूद करणे आवश्यक आहे. शिवाय डिमांड ड्राफ्टच्या पाठीमागे उमेदवाराने स्वत:चे नांव व बैठक क्रमांक नमूद करावा.

**१३. प्रस्तुत परीक्षेचा अभ्यासक्रम आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. तसेच प्रस्तुत परीक्षेच्या अभ्यासक्रमाच्या प्रती विक्रीसाठी ठेवण्यात आल्या असून, विक्रेत्यांची यादी आयोगाच्या उपरोक्त वेबसाईटवर उपलब्ध आहे.**

**ठिकाण:- मुंबई**
दिनांक :- १३ नोव्हेंबर, २००९.

**दी. प्र. मिरजकर**
उपसचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.